नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३३ Issue - 133 | वार मंगळवार दि. ३० सप्टेंबर २०२५ Blow- Tuesday Date 30 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

अतिवृष्टी, पूरपरिस्थितीमुळे परीक्षा अर्ज भरण्यास २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

राज्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिक्षणमंत्र्यांना निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि त्यामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास अडचण येत असल्याने त्याला दि. २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना दूरध्वनी करून मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले होते.

राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची उद्या दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी शेवटची मुदत आहे. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टिमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याम ुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांना संपर्क करून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी शिक्षण मंत्री श्री. भुसे यांना बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत निर्णय घेण्यास सांगितले.

शिक्षणमंत्र्यांनी लगेचच राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क केला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देशही दिले. त्यानुसार शिक्षण विभागामार्फत २० ऑक्टोबर पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया करण्यात आली. त्याचबरोबर बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे तसेच नवीन परीक्षा केंद्रासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.

बिष्णोई गँगला सुरुंग लावणारा मोठा निर्णय, नांग्या ठेचल्या जाणार? आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना घोषित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ओटावा : कॅनडा सरकारने बिष्णोई गँगला आतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. गेल्या काही दिवसांपासून कॅनडामध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराच्या घटनांनंतर कॅनडा सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. कॅनडा सरकारकडून याबाबत अधिकृत माहितीदेखील जारी करण्यात आली आहे. कॅनडामध्ये हिंसा आणि दहशवादी कृत्यांना कोणतीही जागा नाही. विशेषत: एखाद्या समुदायाला निशाणा बनवत भीती, धमकी देणं आणि दहशतीचं वातावरण तयार करणाऱ्यांना कोणतीही जागा नाही, असं कॅनडा सरकारने म्हटलं आहे. कॅनडाचे जन सुरक्षा मंत्री गैरी आनंदसांगरी यांनी आज याबाबत घोषणा केली.

कॅनडामध्ये प्रत्येक व्यक्तीला आपल्या घरात आणि समाजात सुरक्षित राहण्याचा अधिकार आहे. बिष्णोई गँगने काही समाजाला भीती आणि हिंसाचाराचा निशाणा बनवलं आहे. या गँगला दहशतवादी सूचित टाकून आम्ही गुन्हेगारांना रोखण्याचं आणि समाजाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आम्ही प्रभावी पाऊल उचललं आहे, असं जन सुरक्षा मंत्री गैरी आनंदसांगरी यांनी म्हटलं आहे.

कॅनडा सरकारच्या माहितीनुसार, आता देशात क्रिमिनल कोड अंतर्गत एकूण ८८ दहशतवादी संघटना आहेत. क्रिमिनल कोडच्या नियमानुसार कोणत्याही दहशतवादी संघटनेच्या संपत्ती किंवा वित्तीय सेवेचं कार्य करणे हा गुन्हा आहे. कॅनडाची राष्ट्रीय पोलीस सेवा, रॉयल कॅनडियन माउंडेट पोलीस हे दहशतवादी कारवायांना रोखण्यासाठी काम करत आहेत.

कॅनडा सरकारच्या या कारवाईने बिष्णोई गँगला मोठा झटका बसला आहे. आता बिष्णोई गँगची कॅनडामधील संपत्ती, वाहनं जप्त केले जाऊ शकतात. तसेच तपास यंत्रणांना बिष्णोई गँगच्या विरोधात कडक कारवाई करण्यासाठी जास्त ताकद मिळेल. दहशतवादी कारवाया, त्यांची भरती आणि प्रवास रोखता येईल. तसेच बिष्णोई गँगच्या संपत्तीशी संबंधित कोणताही व्यवहार झाला तर तो गुन्हा मानला जाणार आहे. तपास यंत्रणांचं त्याकडे बारकाईने लक्ष असणार आहे.

बिष्णोई गँग शक्यतो कॅनडातील स्थलांतरीत समुदायाला लक्ष्य करतात. ते या समुदायातील व्यवसायिक व्यक्ती किंवा कलाकारांना टार्गेट करतात. अशा व्यक्तींकडे खंडणीची मागणी करत धमकी देतात. तसेच खंडणी दिली नाही तर खून, गोळीबार किंवा जाळपोळ करुन दहशत पसरवतात. आता या टोळीला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केल्याने तपास यंत्रणांना कारवाई करणं सोपं होणार आहे.

अतिवृष्टीचा फटका, पैठणमध्ये तब्बल ८००० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवलं, गावच्या गावं केली रिकामी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : अतिवृष्टी आणि जायकवाडी धरणातून रविवारी रात्री ३ लाख क्युकेस विसर्ग करण्यात आल्याने पैठण शहर तसेच गोदावरी नदी काठाच्या गावांना पुराचा फटका बसला. पूर परिस्थितीमुळे शहरातील तसेच १३ गावातील ८ हजार ७४ लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. या पुरग्रस्तांना शाळा, मंगल कार्यालय आदी ठिकाणी निवारा केंद्र उभारण्यात आले आहेत. वरील भागातून मोठ्या प्रमाणात होणारी पाण्याची आवक, अतिवृष्टी यामुळे पैठण येथील जायकवाडी धरणातून रविवारी दुपारनंतर टप्प्या टप्प्याने पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला. रात्री तीन लाख क्युसेक विसर्ग करण्यात आल्याने गोदावरी नदीला पूर आला. पुराचे पाणी पैठण शहर परिसरात शिरल्याने नागरिकांम ध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. दुपारनंतरच शहरासह नदीकाठाच्या गावांमध्ये पाणी शिरले होते.

पाण्याचा नदीपात्रात वाढत्या विसर्गामुळे पुर परिस्थितीही गंभीर होत गेली. नाथ मंदिरात पाणी शिरले. यासह छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, बसस्थानक परिसरासह कहार वाडा, हमाल गल्ली, प्रतिष्ठान कॉलेजमागील काही रहिवासी, संतनगर, गागाभट्ट चौक परिसरासह सराफ गल्ली पुराच्या पाणीने वेढल्या गेली. प्रशासनाने पूर परिस्थिती लक्षात घेता सखल भागातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविले.

पैठण शहरातील ३१६ कुटुंबातील १ हजार ५८० व्यक्तींना शहर परिसरातील प्रतिष्ठाण महाविद्यालय, श्रीनाथ हायस्कूल, अभिनंदन मंगल कार्यालय, आर्य चाणक्य हायस्कूल, बाबा म ठ, शिवेश्वर मंगल कार्यालय आदी ठिकाणच्या निवारा केंद्रात राहण्याची सोय करण्यात आली आहे. यासह नदी काठाच्या कावसान जुने, दादेगाव जहा, नायगाव, वडवाली, चनकवाडी, तेलवाडी, आपेगाव, नवगाव, मायगाव, कुरणप्रिंपी, हिरडपुरी, पाटेगाव, आवडे उचेगाव आदी गावांना देखील पुराचा फटका बसला आहे.

या १३ गावातील १ हजार २५८ कुटुबांतील ६ हजार ४९४ व्यक्तींना विहामांडवा, आपेगाव, आनंदपुर, पैठण शहर आदी ठिकाणाच्या मंगल कार्यालय, शाळा आदी ठिकाणी उभारण्यात आलेल्या या निवारा केंद्रात राहण्याची सोय करण्यात आली आहे. पुरग्रस्तांना निवारा केंद्रात पाणी, जेवणाची व्यवस्था करण्यात आली असून आरोग्य पथकही तैनात करण्यात आले आहे. तर या पुरामुळे नदी काठाच्या शेतीला मोठा फटका बसला आहे. नुकसान भरपाई तातडीने द्यावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, पुराचा जोर काहीसा ओसरला असला तरी सखल भागात पाणी कायम असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

चीनची मक्तेदारी संपणार! राजस्थानमध्ये सापडला सर्वात मोठा पांढऱ्या सोन्याचा साठा, ८० टक्के गरज भागणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पृथ्वीवरील दुर्मिळ खनिजांवर चीनची मक्तेदारी संपुष्टात येत आहे. चीनसोबतच्या तणावानंतर भारतानेही देशात अशा खनिजांचा शोध वाढवला आहे. राजस्थानम धील नागौर येथील देगाना प्रदेशात लिथियमचा मोठा साठा सापडला आहे. या खनिजाला पांढरे सोने असेही म्हणतात. हा आजपर्यंतचा देशातील सर्वात मोठा साठा मानला जातो. महत्त्वाचे म्हणजे, भारत सध्या आपल्या लिथियमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी चीनवर अवलंबून आहे. ७० ते ८० टक्के पुरवठा चीनमधून आयात करतो. इतक्या मोठ्या साठ्याच्या शोधामुळं भारताचे चिनी महाकाय कंपनीवरील अवलंबित्व संपणार आहे.

अधिक महत्त्वाचे म्हणजे, केंद्र सरकारच्या खाण मंत्रालयाने लिथियम साठ्यासाठी लिलाव प्रक्रिया देखील सुरु केली आहे. निविदा कागदपत्रे २३ सप्टेंबरपासून विक्रीसाठी उपलब्ध आहेत आणि सादर करण्याची अंतिम तारीख १ डिसेंबर २०२५ आहे.

अंदाजे लिथियम साठा: १४ दशलक्ष टन

भारतीय भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, येथे सापडलेल्या लिथियम साठ्याचा अंदाज १४ दशलक्ष टन आहे. या मोठ्या साठ्यामध्ये भारताच्या एकूण मागणीच्या अंदाजे ८० टक्के भाग पूर्ण करण्याची क्षमता आहे. या शोधामुळे भारत लिथियममध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने प्रगती करू शकतो. बॅटरी उत्पादन, इलेक्ट्रिक वाहने आणि अणुऊर्जा प्रकल्पांसाठी लिथियम महत्त्वपूर्ण आहे. देगानाम ध्ये खाणकाम सुरू केल्याने चीनवरील अवलंबित्व कमी होईल आणि देशाची धोरणात्मक स्थिती मजबूत होईल.

रेवंत टेकड्यांमध्ये सापडलेले टंगस्टन

देगानाच्या रेवंत टेकड्या त्यांच्या खनिज संपत्तीसाठी फार पूर्वीपासून ओळखल्या जातात. ब्रिटिश राजवटीत १९१४ मध्ये येथे टंगस्टनचा शोध लागला. स्वातंत्र्यापूर्वी, पहिल्या महायुद्धात देशात उत्पादित होणारे टंगस्टन ब्रिटिश लष्करी शस्त्रास्त्रे तयार करण्यासाठी वापरले जात होते. टंगस्टन खाणकाम बराच काळ चालू राहिले परंतु नंतर ते बंद करण्यात आले. आता, याच टेकड्यांमध्ये लिथियम साठ्याची पुष्टी झाल्याने ते पुन्हा एकदा प्रकाशझोतात आले आहेत.

नागौर व्यतिरिक्त, जम्मू आणि काश्मीरच्या रियासी जिल्ह्यातील सलाल-हैमाना भागात ५.९ दशलक्ष टन लिथियमचा साठा सापडला आहे. छत्तीसगडमधील कोरबा येथील देशातील पहिली लिथियम खाण लिलाव करण्यात आली आहे आणि खाणकाम सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहे. कर्नाटकच्या मंड्या जिल्ह्यात १४ हजार१०० टनांचा साठा सापडला आहे. बिहार, ओडिशा, झारखंड, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि गुजरातमध्येही संभाव्य लिथियम साठ्यांचा शोध घेतला जात आहे. अद्याप कोणत्याही राज्यात खाणकाम सुरू झालेले नाही. पांढरे सोने म्हणून ओळखले जाते. ते मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रिक वाहने आणि रिचार्जेबल बॅटरीमध्ये वापरले जाते. भारतात, जिथे ईव्ही क्षेत्र वेगाने वाढत आहे, त्याची मागणी सतत वाढत आहे. देगानामध्ये खाणकाम सुरू झाल्याने राज्याचे उत्पन्न आणि रोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ होईल. राजस्थानमध्ये लिथियम उत्पादन सुरू होणे केवळ राज्यासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी गेम चेंजर ठरू शकते. यामुळे, भारत केवळ आयातीवरील अवलंबित्व कमी करणार नाही तर जागतिक स्तरावर लिथियम बाजारपेठेत आपले स्थान मजबूत करेल.

आजतागायत शेतकऱ्यांच्या हाती एकाही रुपयाची मदत नाही — **उपविभागीय कार्यालय, सिंदखेड राजा येथे दिले निवेदन**

बुलढाणा जिल्ह्यातील १९८ शेतकऱ्यांचा जलसमाधीचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर गेल्या काही महिन्यांपासून सतत संकट कोसळत आहे. दि. २६ फ ेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे सिंदखेड राजा तालुक्यातील पळसखेड चक्का गावातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शासनाच्या आदेशात या गावाचा समावेश जाहीर झाला असला तरी आजतागायत शेतकऱ्यांच्या हाती एकाही रुपयाची मदत पोहोचलेली नाही. हा शेतकऱ्यांवरील स्पष्ट अन्याय आहे.

याशिवाय, गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी, ढगफुटी व मुसळधार पावसामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आगामी हंगाम धोक्यात आला असून शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत व आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभे आहेत.

या गंभीर परिस्थितीवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी करत आज शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने १९८ शेतकऱ्यांनी उपविभागीय कार्यालय, सिंदखेड राजा येथे जोरदार इशारा देत निवेदन सादर केले.

विशेष म्हणजे, प्रत्येक शेतकऱ्यांनी वैयक्तिक स्वरूपात स्वतंत्र निवेदन दिले आहे तसेच शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीनेही एक एकत्रित निवेदन सादर करण्यात आले आहे. या सर्व निवेदनांमध्ये एकच मुद्दा आणि एकच आंदोलन ठरलेले आहे - ९ आक्टोंबर रोजी दुपारी ११ वाजता पळसखेड चक्का येथील पातळगंगा नदीवरील पुलाजवळ जलसमाधी आंदोलन करणे. सर्व शेतकऱ्यांचे वैयक्तिक निवेदन आणि संघटनेचे निवेदन एकत्रित रूपात एकच आंदोलन ठिकाण आणि एकच आंदोलन म्हणून साकारले जाणार आहे.

शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री. बालाजी जोशी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की - शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास आम्ही बलिदान द्यायलाही तयार आहोत. सरकारने त्वरित निर्णय घेऊन मदत करावी, अन्यथा शेतकरी आंदोलन उग्र होईल.

समितीच्या ठाम मागण्या पुढीलप्रमाणे आहेत

पळसखेड चक्का येथील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना मंजूर मदत तातडीने वितरित करावी. बुलढाणा जिल्हा ओला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान ५०,००० रुपये मदत द्यावी. पंजाबप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दलाल व बँकांच्या जाळ्यात न अडकवता थेट खात्यावर मदत द्यावी. जर शासन व प्रशासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर जलसमाधी आंदोलन अपरिहार्य ठरेल. त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

आत्मनिर्भर भारत

पृथ्वीवरील दुर्मिळ खनिजांवर चीनची मक्तेदारी संपुष्टात येत आहे. चीनसोबतच्या तणावानंतर भारतानेही देशात अशा खनिजांचा शोध वाढवला आहे. राजस्थानमधील नागौर येथील देगाना प्रदेशात लिथियमचा मोठा साठा सापडला आहे. या खनिजाला पांढरे सोने असेही म्हणतात. हा आजपर्यंतचा देशातील सर्वात मोठा साठा मानला जातो. महत्त्वाचे म्हणजे, भारत सध्या आपल्या लिथियमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी चीनवर अवलंबून आहे. ७० ते ८० टक्के पुरवठा चीनमधून आयात करतो. इतक्या मोठ्या साठ्याच्या शोधामुळं भारताचे चिनी महाकाय कंपनीवरील अवलंबित्व संपणार आहे. अधिक महत्त्वाचे म्हणजे, केंद्र सरकारच्या खाण मंत्रालयाने लिथियम साठ्यासाठी लिलाव प्रक्रिया देखील सुरु केली आहे. निविदा कागदपत्रे २३ सप्टेंबरपासून विक्रीसाठी उपलब्ध आहेत आणि सादर करण्याची अंतिम तारीख १ डिसेंबर २०२५ आहे. भारतीय भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, येथे सापडलेल्या लिथियम साठ्याचा अंदाज १४ दशलक्ष टन आहे. या मोठ्या साठ्यामध्ये भारताच्या एकूण मागणीच्या अंदाजे ८० टक्के भाग पूर्ण करण्याची क्षमता आहे. या शोधामुळे भारत लिथियमम ध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने प्रगती करू शकतो. बॅटरी उत्पादन, इलेक्ट्रिक वाहने आणि अणुऊर्जा प्रकल्पांसाठी लिथियम महत्त्वपूर्ण आहे. देगानामध्ये खाणकाम सुरू केल्याने चीनवरील अवलंबित्व कमी होईल आणि देशाची धोरणात्मक स्थिती मजबूत होईल. देगानाच्या रेवंत टेकड्या त्यांच्या खनिज संपत्तीसाठी फार पूर्वीपासून ओळखल्या जातात. ब्रिटिश राजवटीत १९१४ मध्ये येथे टंगस्टनचा शोध लागला. स्वातंत्र्यापूर्वी, पहिल्या महायुद्धात देशात उत्पादित होणारे टंगस्टन ब्रिटिश लष्करी शस्त्रास्त्रे तयार करण्यासाठी वापरले जात होते. टंगस्टन खाणकाम बराच काळ चालू राहिले परंतु नंतर ते बंद करण्यात आले. आता, याच टेकड्यांमध्ये लिथियम साठ्याची पुष्टी झाल्याने ते पुन्हा एकदा प्रकाशझोतात आले आहेत. नागौर व्यतिरिक्त, जम्मू आणि काश्मीरच्या रियासी जिल्ह्यातील सलाल-हैमाना भागात ५.९ दशलक्ष टन लिथियम चा साठा सापडला आहे. छत्तीसगडमधील कोरबा येथील देशातील पहिली लिथियम खाण लिलाव करण्यात आली आहे आणि खाणकाम सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहे.

धर्माचे रक्षण कराल तर धर्म तुमचे रक्षण करेल : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट /प्रतिनिधी : आपला देश धर्म पाळणारा असून धर्म या शब्दाला पर्याय नाही.धर्माचे रक्षण कराल तर धर्म तुमचे रक्षण करेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोठा होईल या भीतीने अनेक आरोप करीत संघाचे दमण करण्याचा प्रयत्न झाला पण हे कोणालाही शक्य झाले नाही. संघावर बंदी घातली तरी संघ मोठ्या प्रमाणात उफाळून वर आला आहे. देशाला परम वैभवाला नेण्यासाठी संघ कटीबद्ध असून हिंदू समाजाने संघटित होऊन पुढे गेले पाहिजे. संघशताब्दी वर्षात संघाने पाच बिंदूवर काम करण्याचे ठरवले असून यामध्ये सर्वांनी सहभाग घ्यावे असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे धर्मजागरण विभागाचे प्रांतप्रमुख श्रीनिवास पुलय्या यांनी केले.

अक्कलकोट येथील प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सवाचे(शस्त्र पूजन) रविवारी सायंकाळी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते मार्गदर्शनपर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून काशी शाखा मठ हुबळीचे श्री.ष.ब्र.१०८राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी, तालुका संघचालक रवींद्र जोशी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात आले त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. विजयादशमी उत्सव कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह चेतन जाधव यांनी केले. सांघिक पद्य तालुका सहकार्यवाह संतोष वगाले यांनी तर वैयक्तिक पद्य मयूर स्वामी यांनी म्हटले. प्रमुख प्रमुख मान्यवरांचा परिचय राजकुमार कोरे यांनी करून दिला. याप्रसंगी मनोरे व सूर्यनमस्कारचे प्रात्यक्षिक कैवल्य नखाते, मिलिंद पाटील व सर्वज्ञ कलबुर्गी यांनी घेतले.

याप्रसंगी पुढे बोलताना धर्म जागरणचे प्रांतप्रमुख पुलय्या यांनी संघाला १०० वर्ष झाल्याचे सांगून १०० वर्षातील संघाच्या कामगिरीचा आढावा घेतला. विजयादशमी म्हणजे दसरा हा केवळ सण नसून तो धर्माच्या विजयाचे,असत्यावर सत्याच्या आणि अधर्मावर धर्माच्या विजयानंतरचे प्रतीक असल्याचे सांगितले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये विजयादशमीच्या दिवशी डॉ.केशव हेडगेवार यांनी नागपूरमध्ये केली. यंदा संघशताब्दी वर्षात संघ विजयादशमी उत्सव, गृहसंवाद अभियान, हिंदू संमेलन, सामाजिक सद्भाव,प्रमुख जनसंवाद,युवा कार्य,शाखा विस्तार व बाल विभाग यावर कार्य करणार आहेत.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे काशी शाखा मठ हुबळीचे श्री.ष.ब्र.१०८ राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे आशीर्वचन झाले. त्यानंतर संघाची प्रार्थना होऊन विजयदशमी उत्सवाची सांगता झाली. या विजयादशमी उत्सवाच्या कार्यक्रमास आ.सचिन कल्याणशेट्टी,अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले,मिलन कल्याणशेट्टी,आनंद तानवडे,महेश हिंडोळे,धर्मजागरण पुणे विभाग सहसंयोजक प्रसाद हारकुड,ऋषिकेश पुराणिक धर्मजागरण सोलापूर जिल्हा सहसंयोजक,धर्मजागरण संस्कृती जिल्हाप्रमुख लक्ष्मीकांत बिराजदार, व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ साखरे,लायन्स क्लब अध्यक्ष अभय खोबरे,लायन्स क्लबचे झोन चेअरमन मल्लिकार्जुन मसुती,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब निंबाळकर, सचिव शिवानंद फुलारी प्रभाकर मजगे,प्रदीप पाटील,अमोल हिप्परगे,अक्कलकोट आयटीआयचे अध्यक्ष राजशेखर हिप्परगी, उद्योगपती विलास कोरे,विजय माळगे, डॉ.शिवराय आडवीतोटे, वर्षाराणी जंगम, एम.बी.पाटील, मल्लिकार्जुन आळगी, शिवशरण खुबा,लायन्स क्लब सचिव शिरीष पंडित, महेश वागदरे, गुंडूअण्णा येळमेली आदी, प्रसन्ना हत्ते, राजशेखर उमराणीकर, श्रीशैल जडगे, रवि वाघमोडे, ऋषी लोणारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चेतन जाधव,संतोष वगाले,आनंद देसाई, आदित्य जोशी,अक्षय सरदेशमुख, सायबन्ना सोनकांबळे, गुंडू येळमेली, धवल भजभुजे, कैवल्य नखाते, मिलिंद पाटील, निलेश माळी, राजकुमार कोळेकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका कार्यवाह चेतन जाधव यांनी तर आभारप्रदर्शन संतोष वगाले यांनी मानले.

मानव अधिकार आंदोलन संघटनेची मागणी

नवीन शिधापत्रिका धारकांना तात्काळ धान्य उपलब्ध करा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यात गेल्या चार ते पाच वर्षापासून नवीन शिधापत्रिका तहसील कार्यालया मार्फत दिलेल्या आहेत, परंतु सदरील शिधापत्रिकाधारकांना अद्यापही धान्य उपलब्ध झाले नसल्यामुळे अशा लाभधारकांची शोध मोहीम राबवून त्यांना तात्काळ धान्य उपलब्ध करुन त्यांची होणारी गैरसोय व उपासमार थांबवावी अशी मागणी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने कळंब तहसीलचे तहसिलदार हेमंत ढोकले यांना निवेदनाद्वारे केली आहे.दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कळंब तालुक्यामध्ये अनेक शिधापत्रिकेमध्ये

मयत नागरिकांचा समावेश असून त्यांची नावे अध्यापही वगळण्यात आलेली नसल्यामुळे त्यांचे शिल्लक राहत असलेले धान्य नवीन शिधापत्रिकाधारकांना देण्यात यावे. तसेच अंत्योदय अन्नसुरक्षा योजनेमधील लाभार्थ्यांना गेल्या वर्षभरापासून साखर बंद असल्यामुळे लाभधारकांना साखरेचे वाटप करण्यात यावे. तसेच तालुक्यातील अनेक स्वस्त धान्य दुकानदार हे लाभधारकांना धान्य उचलल्यास पावती देत नाहीत अशी चर्चा तालुक्यांमध्ये चालु असल्यामुळे सदरील दुकानदार हे पावती देतात का नाही? याची तात्काळ चौकशी करण्यात यावी. तसेच अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या व घरांची पडझड झालेल्या नागरिकांना तात्काळ शासनाकडून मदत देण्यात यावी. आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, सचिव दत्तात्रय मोरे,सामाजिक कार्यकर्ते धम्मपाल वाघमारे, बाबासाहेब टोपे, बाळासाहेब सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

विद्यार्थ्याच्या जीवनाला योग्य दिशा दाखवणारा दीपस्तंभ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : शिक्षक म्हणजे फक्त ज्ञान देणारा नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा दाखवणारा दीपस्तंभ असतो विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जगवतात शिस्त रुजवतात आणि त्यांच्या यशाचा पाया रचतात असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अक्कलकोट येथे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला तालुका शाखा अक्कलकोटच्या वतीने तालुकास्तरीय साने गुरुजी आदर्श शिक्षकरत्न पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.यावेळी कल्याणशेट्टी बोलत होते.याप्रसंगी व्यासपीठावर प्रशांत अरबाळे गटशिक्षणाधिकारी

अक्कलकोट शाखेच्या वतीने पुरस्कार वितरण

परमेश्वर व्हसुरे साने गुरुजी कथामाला तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील रमेश येणेगुरे सुरेश पिरगोंडे विठ्ठल हेगडे मुस्ताक शेख आदी उपस्थित होते.तालुक्यातून १० शिक्षकांना शाल सन्मानचिन्ह प्रमाणपत्र टोपी व श्यामची आई पुस्तक भेट देऊन गौरविण्यात

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीशैल म्हमाणे, फारुक शेख ,सचिन गडसिंग, शिवाप्पा साखरे, सिद्धेश्वर पारगोंडे, मलकप्पा भरमशेट्टी वाहिद पटेल राजशेखर विजापूरे यांनी परिश्रम घेतले.

यांचा झाला गौरव

राजशेखर पाटील, सूर्यकांत हिंगमिरे, अवधूत कदम, विश्वनाथ हत्तरके, महेश मोरे, धनंजय जोजन, रामनगौडा पाटील, धर्मराज बिराजदार, चंद्रकांत पाटील, कळप्पा गिरगाव .

जागर- स्त्री शक्तीचा : श्रीमती.शिला मुदगडे उमरगा तालुक्यातील पहिल्या महिला केंद्रप्रमुख

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

उमरगा/प्रतिनिधी

शिक्षणाचे बाळकडू ज्योतिबाने सावित्रीला पाजलं ती सावित्री जिच्या लेकी घराघरात शिक्षणाचं काकण बांधून समाजात स्वतःचा ठसा निर्माण करत, आकाशात उंच विहार करत आहेत, स्वतःच्या जिद्दीने ,कष्टाने समाजातल्या दांभिकतेवर वेळोवेळी आसूड ओढत त्या स्वतःच्या आत्मविश्वाने , स्त्री जीवनाचा आलेख उंचावत जगातल्या वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण दिशा चोखाळत आहेत. शिक्षण क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारी अशीच एक ही नवदुर्गा, संघर्षातून जीवन उभा करणे म्हणजे शून्यातून विश्व निर्माण करणे, राखेतून सुद्धा फिनिक्स पक्षाप्रमाणे उंच भरारी घेणाऱ्या नवदुर्गापैकी एका दुर्गेच्या प्रेरणादायक कहाणीचा जागर करणार आहोत. अत्यंत संयमी ,शांत ,नियोजनबद्ध कार्य शैली अशी ओळख असणाऱ्या नवदुर्गापैकी एक दुर्गा म्हणजे मुदगडे मॅडम तशी त्यांची माझी ओळख ही एक शिक्षिका व अधिकारी म्हणूनच होती पण मी ज्या वेळेस त्यांच्या कार्याचा अभ्यास केला,त्यावेळी लक्षात आले की त्यांची अफाट विकसित व्यक्तिमत्त्व, तन मन धनाने कार्य करण्याची शक्ती, सतत विद्यार्थी दशेत राहून शिक्षण घेण्याची कला,शिक्षण क्षेत्र असेच क्षेत्र आहे जिथे प्रत्येक क्षणी सचोटी लागते कार्य प्रवनता हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.घर

प्रपंच पाहताना सुद्धा चार माणसे सांभाळताना आपली कसरत लागते, पण एवढी विशालसेना शिक्षकांची, जिल्ह्यातील सर्वात जास्त शाळा असलेले केंद्र, केंद्रातील भरम साठ विद्यार्थी संख्या, त्या अगदी कार्यकुशलतेने सांभाळतात. वेगवेगळे उपक्रम, नाविन्यपूर्ण प्रकल्प आढावा बैठक,गुणवत्ता विकास शिक्षणक्षेत्र पुढे नेण्याची त्यांच्यातील ही जिद्द खरंच वाखानन्याजोगी आहे. ही प्रेरणा आज लाखो स्त्रियांना एक इतिहास लिहिण्यासाठी प्रेरणा होऊ शकते. त्यांची जी ओळख आहे ती ओळख म्हणजे एक उपक्रमशील सक्रिय, कार्यतत्पर, कर्तव्यदक्ष अधिकारी अशी आपणास देता येईल जरी त्या एक महिला अधिकारी जरी असल्या तरीही त्या कार्य कुशलतेने अगदी एका पुरुषाला लाजवेल असे कार्य करत आहेत. त्यांच्या जीवन संघर्षाच्या कहानीतून आपण आज लाखो महिलांनी प्रेरणा घेऊन अशी एक आपली समाजामध्ये नवीन ओळख निर्माण करता आली पाहिजे अशी त्यांची प्रेरणादायी कहाणी आहे.

यश गाठण्यासाठी काय संघर्ष करावा लागतो व ते यश किती गोड सुखद असते याचे जिवंत उदाहरण दर्शविणारी उपक्रमशील सक्रिय अधिकारी अशी नाविन्यपूर्ण ओळख असलेल्या या दुर्गा मातेला माझा मानाचा सलाम.

– लेखन श्रीमती रूपाली वेदपाठक, उमरगा

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेनुसार राष्ट्र निर्माण करण्यासाठी कटिबद्ध व्हावे : ॲड. एस. के. भंडारे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना व समाजाला झालेल्या विषमतेचे,चातुर्वर्णाचे बसलेले चटके त्यामुळे त्यांनी २३ सप्टेंबर १९१७ रोजी केलेल्या संकल्पानुसार संविधानाच्या माध्यमातून धर्म, वंश,

जात, जन्मस्थान, स्त्री, पुरुष , रूढी, परंपरा इत्यादीवरून कोणतीही विषमता न करता सर्वांना समानतेचे मूलभूत अधिकार देऊन आपल्या पूर्वजांच्या गळ्यातील मडके आणि पाठीचा खराटा कायमचे काढले आहेत परंतु ते सांकेतिक दृष्ट्या पुन्हा ते आणण्यासाठी समतेचे विरोधक पुन्हा प्रयत्न करीत आहेत, देशात जातीय तेढ निर्माण होत असून असहिष्णुता वाढत आहे. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी लोकशाहीसाठी जे १२ धोके आणि इशारे दिले त्यातील एक महत्वाचा असा आहे की, डॉ बाबासाहेब म्हणतात देश म्हणजे जाती जातीने बनला आहे तो देश, मात्र आपण राष्ट्र निर्माण करायचे आहे म्हणजे जाती अंत करावा , जनतेत राष्ट्र भावना निर्माण करण्यासाठी सरकारने करावे. व आपही कटिबद्ध व्हावे असे, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे ट्रस्टी/राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रीय कार्यालय प्रमुख ड एस के भंडारे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्रांती प्रस्थापित कशी मागे घेऊन चालले आहेत याचे विवेचन करून ती आठ गोल्डन मार्गाने कशी गतिमान कशी करावी या बाबत ,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या बौद्धांच्या मातृ संस्थेच्या केंद्रीय प्रशिक्षण विभागाने दिनांक २३/ ९/ २०२५ ते २/ १०/ २०२५ या कालावधीत देशातील विविध राज्यातील प्रमुख पदाधिकारी यांची अखिल भारतीय इंटरान्स टेस्ट घेऊन मेरिट ने प्रथम पास झालेल्या विविध राज्यातील पदाधिकारी

यांच्या केंद्रीय शिक्षक प्रशिक्षण शिबिर (हिंदी), चैत्यभूमी, दादर, मुंबई येथे दिनांक २६/ ९/ २०२५ रोजी मागदर्शन केले.

ड एस के भंडारे यांनी पुढे असे सांगितले की,बौद्ध ही समतेची विचारधारा आहे त्यामुळे जाती अंत करण्यासाठी संविधान समर्थक जो डो अभियान राबविले पाहिजे.त्यानंतर त्यांनी संस्थेचे कामकाज आणि लेखा पद्धती याविषयावरही मार्गदर्शन करताना पदाधिकारी यांनी समाजाच्या पैशाचा हिशोब पारदर्शक पने कसा द्यायचा याची सविस्तर माहिती दिली. यावेळी शिबिराचे मुख्य भिक्खु भंते विशुद्धानंद व व्यवस्थापक एम डी सरोदे गुरुजी (उपप्रमुख, केंद्रीय प्रशिक्षण विभाग), व सुनिल बनसोडे (सदस्य, केंद्रीय प्रशिक्षण विभाग व सचिव, मुंबई प्रदेश) तसेच बी. एम कांबळे (राष्ट्रीय सचिव) हे उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन

मंदिर समिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती ; पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, श्री क्षेत्र पंढरपूर व श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग - सामूहिक चिंतन महाप्रकल्प, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त दि. ०४ व ०५ ऑक्टोंबर २०२५ रोजी श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे श्री ज्ञानेश्वरी चिंतन राज्यस्तरीय संमेलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

सदर राज्यस्तरीय संमेलनाबाबत दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता दुरदृष्य प्रणालीद्वारेमं मंदिर समितीची सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. या सभेस सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी दुपारी ४ वाजता उद्घाटन सोहळा पार

जिल्हाधिकारी आशिर्वाद यांच्या उपस्थितीत होणार समारोप

पडेल. यावेळी आचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे संमेलनाची भूमिका सादर करतील, तर ह.भ.प.चंद्रशेखर महाराज देगलूरकर बीज भाषण देतील. ह.भ.प. श्री भागवत महाराज साळुंके यांच्याकडून श्री निवृत्ती - ज्ञानदेव संवाद होईल.

या सभेत सदरचा कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विविध परिसंवाद व व्याख्याने होणार आहेत. यात डॉ.दिलीप धनेश्वर यांचा परिसंवाद होणार असून, त्यामध्ये श्री.उल्हास घोडके - श्री ज्ञानेश्वर महाराज निरुपित कर्मयोग, सौ.इंदुताई खेडकर - श्री ज्ञानेश्वर महाराज निरोपित भक्तीयोग, प्रा.श्री. सुदाम देवखिळे - आत्मसंयमयोग संकल्पना आणि स्वरूप, सौ.सुचित्रा भालेराव - ज्ञानविज्ञान: विचार आणि जाण, श्री संजय खेले - संप्रदाय पांघुरौनी यांचा सहभाग असणार आहे. यासोबत श्रीमद् भगवद्गीता व ज्ञानेश्वरीतील पात्रांचा तौलनिक विचार या विषयांवर ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर, ह.भ.प.जयवंत महाराज बोधले श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित अमृतानुभव, तर डॉ. मीनाक्षी पाटील श्री चांगदेव पासष्टी या विषयांवर व्याख्याने देतील.

राज्यस्तरीय संमेलन मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून, उद्घाटन सोहळा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार आहे तर कार्यक्रमाचा समारोप जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

ह.भ.प.उमेश बागडे हे कार्यक्रमाचे समन्वयक असणार आहेत. कार्यक्रमास ह.भ.प.अभय महाराज टिळक यांचे मनोगत ऐकायला मिळतील आणि डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे संमेलनाचा संपूर्ण आढावा सादर करतील. त्यानंतर संत पुजन, आभार प्रदर्शन व सामूहिक पसायदानाने संमेलनाची सांगता होईल असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले. सदरचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहे.

नवरात्र महोत्सव: आठवी माळ.

श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक कन्याकुमारी पोषाखासह अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे आठव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस कन्याकुमारी पोषाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास (कत्स्य अवतार) सोन्याचे मुकुट, नाम, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगन जोड, दंडपेट्या जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच लहान, मत्स्य जोड, लक्ष्मी पदक लॉकेट, तुळशीची माल १ पदरी, मोत्याचे कंठी, मोहनमाळ, ५ पदरी, तोदेजोड, एकदाणी, चांदीचा कास्य इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, जडावाचे तानवड जोड, सूर्य, चंद्र, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, हिऱ्याची नथ, वाळ्या जोड, बाजीराव गरसोळी, जडावाचा हार, ठुशी, वाक्या जोड, पेट्याची बिंदी, पाचूची गरसोळी, खड्याची वेणी, मोत्याचा कंठा, मोत्याचे मंगळसूत्र, चिंचपेटी हिरवी, रूळ जोड, पैंजण जोड, तुळशीची माळ १ पदरी, मद्राशी कंठा इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच राधिका मातेस नक्षी टोप, चंद्रहार मोठा, चिंचपेठी तांबडी, पुतळ्यांची माळ, ठुशी, सोन्याचे बाजूबंद जोड, लक्ष्मीहार व *सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, जवेच्या माळा, ठुशी, जवमानी पदक, इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई - तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आलेला आहे तसेच भाविकांना प्रसाद म्हणून नायलॉन शाबुदाणा वाटप करण्यात आला असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

सांगवी खु येथे पूरग्रस्तांना मदत, पंढरपूरचे शिक्षक विद्याधर भोसले यांच्या कडून किट वाटप

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : सध्या महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात पावसाने धुमाकुळ घातला असून, अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर धरणाच्या वरच्या भागात धुवाधर पाऊस पडल्याने खालच्या भागात मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले असून त्याच पुराच्या पाण्याचा फटका बोरी नदीच्या तोंडाला असलेले सांगवी खु गावाला बसला त्या दरम्यान १५ ते २० घरे पाण्याखाली गेली असून, त्यांना तातडीने सुरक्षित

स्थळी हळविण्यात आले. त्यांच्या जीवना आवश्यक वस्तूंची त्यांच्या घरात पाणी शिरल्याने नासधूस झाली हे प्रसारमध्यमाच्या माध्यमातून कळताच पंढरपूर येथील शिक्षक श्री विद्याधर भोसले यांचे सुपुत्र महाराष्ट्रातील नामवंत आय कॅन ट्रेनिंग अकॅडमी चे संचालक विवेक भोसले सर यांनी तात्काळ दैनंदिन जीवनाआवश्यक वस्तूचे किटचें वाटप केले.

सदर किट मध्ये तांदूळ, शेंगदाणे, रवा, गोडेतेल, साबुदाणा, तूरडाळ, साखर, लालतिखट, हळद, तेल, चहापावडर, या वस्तूचा समावेश असून, त्यांच्या या अनमोल मदतीमुळे पूरग्रस्त कुटूंबाला मदतीचा हात मिळाला आहे.

स्वस्थ नारी सक्षम परिवारअभियान अंतर्गत उपजिल्हा रुग्णालयाने निफाड येथे शिबिराचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्वस्थ नारी सक्षम परिवार अभियान दि.१/१०/२०२५रोजी सकाळी १०.०० ते दु. २.०० या वेळेत उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे आयोजित करण्यात आले आहे.

या अभियानाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली तसेच डॉ सूर्यवंशी निवासी वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या उपस्थितीत होणार आहे, अभियानातील उपक्रम

सर्व महिलांसाठी तपासणी व आरोग्य सेवा :

रक्तदाब, मधुमेह, स्तन, गर्भाशय, मुख व इतर कर्करोग तपासणी, लठ्ठपणा तपासणी, संक्रामक आजार व संसर्गजन्य रोग तपासणी तसेच विशेष तज्ज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन.

निरोगी जीवनशैली व आहार :

स्थानिक अन्नधान्य व आरोग्यदायी आहार याविषयी माहिती, पोषण आहार किट वितरण, किशोरवयीन मुलींकरिता आयरन फॉलिक सिड गोळ्यांचे (ढक्ठ) वितरण.

आरोग्य सेवा घेणाऱ्या लाभार्थी नोंदणी :

माता व बालसंगोपन (चउझउ) कार्ड, आधार व आरोग्य कार्ड तपासणी, डिजिटल नोंदणीची सुविधा.

पूरक कार्यक्रम :

रक्तदान शिबिर, मैत्रिणी मैत्र कार्यक्रम, आभा व आयुष्मान भारत कार्ड काढून देण्यात येणार आहे

महिला व बालकांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी व पोषण सुधारण्यासाठी हे अभियान राबवले जात असून यामध्ये अधिकाधिक महिलांनी सहभागी होऊन आपले आरोग्य तपासून घ्यावे, असे उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत डॉ राजीव तांभाळे, वैद्यकीय अधिक्षक यांनी आवाहन करण्यात येत आहे.

प्लास्टिक कचरा उघड्यावर टाकू नये; मुख्याधिकारी महेश रोकडे यांचे आवाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर शहरात सततच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. जमिनीवर टाकलेले प्लास्टिक पावसाच्या पाण्यासोबत वाहून नेले जाते. सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारी, नाले यामध्ये हे प्लास्टिक अडकून राहते त्यामुळे. शहरात पावसाळ्यामध्ये पाणी तुंबून राहण्याच्या समस्या निर्माण होत आहेत. पंढरपूर शहरातील नागरिकांनी कचरा, प्लास्टिक पिशव्या, बॉटल्स, थर्माकोल, कागद आदी वस्तू उघड्यावर टाकू नये असे, आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

शहरात फुटपाथवरील दुकाने, हातगाड्या, फिरते व्यावसायिक, फळविक्रेते, काही नागरिक तसेच गटारीलगत राहणारे व व्यवसाय करणारे लोक अनेकदा कचरा थेट गटारांमध्ये किंवा उघड्यावर टाकतात. परिणामी गटारे तुंबून पावसाळ्यात स्वच्छता कर्मचाऱ्यांना मोठ्या मेहनतीने तो कचरा साफ करून गटारे सुरळीत करण्याचे काम करावे लागते.शहरातील प्रत्येक नागरिकांनी आपली जबाबदारी ओळखून स्वच्छतेत सहभाग घेतला पाहिजे.

नागरिकांनी घरातील व व्यावसायिक कचरा फक्त घंटागाडीतच द्यावा, घंटागाडी वेळेवर न आल्यास कचरा घरात /दुकानात सुरक्षित ठेवावा व नंतर घंटागाडीतच द्यावा,कोणत्याही परिस्थितीत गटारात किंवा रस्त्यावर कचरा टाकू नये.आपल्या परिसरात स्वच्छतेबाबत सतर्क राहून लहान मुलांना देखील याचे संस्कार द्यावेत. स्वच्छता ही सेवा असून हा संस्कार आहे. शहरातील प्रत्येक नागरिक, प्रत्येक घर, प्रत्येक दुकानदार व व्यावसायिकांनी या बदलाचा भाग व्हावे, एकत्रित प्रयत्नांमुळेच आपले पंढरपूर स्वच्छ, सुंदर आरोग्यदायी होऊ शकेल. असे आवाहनही नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

खांबी येथे धम्मचक्र प्रवर्तन सोहळ्यात प्रबोधन कार्यक्रम संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बाराभाटी : जवळच्या लागुन असलेल्या खांबी पिंपळगाव येथे बुद्ध फुले शाहू आंबेडकरी गायनाचा कार्यक्रम मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, संदीप कापगते उपसभापती पंचायत समिती, दिलवर रामटेके, अनिल दहिवले, तुलाराम खोटेले सरपंच, सचिन डोंगरे मदन रामटेके, रविंद्र खोटेले, शुभम हुमणे, नेमिचंद मेश्राम पो. पा, सुदेश खोटेले,

प्रमोद भेंडारकर, शुभम बहेकार, पुरुषोत्तम डोये, घनश्याम भेंडारकर, प्रकाश शिवणकर, विनय खोटेले, विजय लोणारे, किशोर बोरकर, विकास डुंभरे, प्रकाश रामटेके, नाना रामटेके, हेमराज फुंडे, रुतन लोणारे हेमराज डोंगरे, मिनाक्षी मुनेश्वर, शालुताई खोटेले आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

मान्यवरांनी महामानव तथागत बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. आनंद बुद्ध विहार खांबी यांच्या वतीने ६९व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त तब्बल पाच दिवस रंगारंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज जागृती आणि समाजात समता, बंधुता प्रस्थापित होऊन एकता निर्माण व्हावी हाच एक उद्देश डोळ्यासमोर ठेवून आनंद बुद्ध विहार खांबी येथे अशोक विजयादशमी व ६९ व्या

तरुणांचा उत्साह : समाजाला दिशा देणारे कार्य

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या पाच दिवशीय भीमज्योत प्रज्वलीत कार्यक्रम आयोजित केले आहे. निमित्ताने नव्या क्रांतीचे निळे वादळ युवा ग्रुप खांबी च्या सौजन्याने दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्रौ ८ वाजता आनंद बुद्ध विहाराच्या भव्य आवारात गायक युवराज प्रधान यांच्या बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मदनलाल रामटेके तर संचालन योगेश लोणारे व आभार प्रमोद डोंगरे यांनी मानले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नव्या क्रांतीचे निळे वादळ युवा ग्रुप खांबी यांनी घेतला आहे. कार्यक्रमाला बाहेरगावावरून आणि गावातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती.

रिपाइं (आठवले) सह ग्रामस्थांची मागणी

धाराशिव जिल्हाधिकारी यांची जवळगाव (मे) गावाला भेट दिली असता सदर मागणीचे दिले निवेदन

अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन सरसकट पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के. गायकवाड : अतिवृष्टीच्या पाहणी दौऱ्यात धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यानी तुळजापूर तालुक्यातील जवळगा (.मेसाई) या गावाला भेट दिली असता, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी करून सरसकट ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन रिपाइं (आठवले) सह ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले.

दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्तीकुमार पुजार यांनी तुळजापूर तालुक्यातील जवळगा (मेसाई) या गावाला भेट देऊन अतिवृष्टीने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची व ग्रामस्थांची चौकशी केली केली.

याप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले) चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के सह ग्रामस्थांनी विविध मागण्याचे निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन सरसकट पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी त्याचवेळी त्याचप्रमाणे होणारा मेसेज जवळगा जोडणाऱ्या रस्त्यावर होनाळा जवळ असलेल्या पुलाची उंची वाढवून दळणवळणासाठी हा रस्ता सुरळीत करून द्यावा, जावळगा ते खंडाळ रोड तुळजापूर ते लातूर रोडला जोडावा,मेसाई जवळगा येथील दलित स्मशानभूमीचे बांधकाम करून द्यावे यासह विविध अन्य महत्वाच्या मागणीचे निवेदन देण्यात आले जिल्हाधिकारी धाराशिव यांना देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, माजी उपसरपंच दादासाहेब चौधरी, सचिन लोखंडे, शाहू लोखंडे माजी सरपंच, आप्पाराव लोखंडे पोलीस पाटील रजनीकांत भुसार नागनाथ ननवरे, बाबासाहेब इंगळे, काकासाहेब शिंदे गोविंद जगताप सह ग्रामस्थांच्या सह्या आहेत यावेळी जवळगा मेसाई सज्जाचे मंडळ अधिकारी तलाठी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पावसामुळे पडघा परिसरात शेती, पिकांचे मोठे नुकसान; शेतकरी वर्गाच्या चिंतेत भर

परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी चिंततेत; नुकसान भरपाईची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे भिवंडी तालुक्यात, विशेषतः पडघा परिसरात भातशेती आणि इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात अक्षरशः अश्रू तरळले आहेत. महसूल विभाग तसेच कृषी विभागाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. ग्रामीण भागातील लहान शेतकरी मुख्यतः भातशेतीवर अवलंबून असल्याने या मुसळधार पावसाचा मोठा फटका त्यांना बसला आहे. तालुक्यात असंख्य शेतकरी लहानशा दळीत शेती करतात, ज्यांचे उत्पन्न मर्यादित असते. अशा शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी होत आहे. पावसाळी हंगामातील भातशेती कापणीसाठी तयार झाली असतानाच परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी वर्गाची चिंता वाढली आहे. सायंकाळच्या सुमारास कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे भातपिकाची कणसे पाण्यात बुडाली आहेत, तर अनेक ठिकाणी उभी पिके आडवी झाली

नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे लवकरच करण्यात येतील व शेतकऱ्यांना शासन आदेशा नुसार नुकसान भरपाई देण्यात येईल.
– डी. सी. शिंदे,
भिवंडी तालुका कृषी अधिकारी

आहेत. यामुळे शेतकरी वर्गावर मोठे संकट कोसळले आहे.

आधीच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. त्यातच या पावसामुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाले. शासनाने मदतीसाठी वेळ न घालवता तातडीने शेतकऱ्यांच्या मदतीला धावून यावे.
– भालचंद्र घागस,
स्थानिक शेतकरी

आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर जर अशीच परिस्थिती कायम राहिली, तर शेतकरी वर्गाची दिवाळी अंधारात जाईल, अशी भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केली शेतकऱ्यांना मदत रुपी शेतातील उभे पीक दिले पुरग्रस्तांना मदत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी

राज्यभरात अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर खरीप हंगामाची उभी पिके व घरात पाणी चिरल्याने घराची पडझड व नुकसान व याम ध्ये शेतकऱ्याची पशुधन अडचणीत सापडले असून त्यांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील काही दिवसापासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या म ाध्यमातून पदाधिकारी अतिवृष्टी आणि पूर बाधित शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याची मदत ही पुरवत आहे.

काही दिवसांपूर्वी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पंढरपूर तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून त्यांच्या व्यथा जाणून घेत शेतकऱ्यांना आणि घरात पाणी शिरल्याने घराची पडझड झाल्याने कुटुंबातील तातडीची मदत म्हणून प्रत्येकी दहा हजार रुपये ची रोप रुपयाची आर्थक मदत केली होती. व सध्या शेतकऱ्यांच्या जनावरांचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पशुधनी वाचवण्यासाठी महाराष्ट्र नवनिम र्ण सेना पुढे आले असून मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आपल्या शेतातील चार एकर मका पशुधन वाचवण्यासाठी स्वतः पीक उभे काढून शेतकऱ्यांना मदत रुपी देण्यात आले आहे.

पशुधन वाचवण्यासाठी पूरग्रस्त बाधित शेतकऱ्यांना शेतावरील चार एकर मका चारा पूरग्रस्तांना मदत

शेतकऱ्याचे शेतातील उभी पिके पिकाची नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जानेवारी दगावलेली आहेत. जनावरांचा चाऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी मोठी दातृत्व दाखवत आपल्या स्वतःच्या शेतीतील चार एकर शेतातील उभी मका पीक पूरग्रस्त शेतकऱ्यांना जनावरासाठी मदत रुपी म्हणून भेट दिली आहे.

माढा तालुक्यातील पूरग्रस्त भागातील मुख्य जनावरांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी यांच्यावतीने माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या उपस्थितीत तहसीलदार माढा यांच्याकडे पशुधनासाठी चारा देण्यात आला आहे माढा म तदारसंघातील पूर्वाधित भागांमध्ये पशुधन वाचवण्यासाठी ट्रॅक्टर मधून मका पिकाच्या बांधलेल्या पेंड्या पाठवण्यात आले. मनसेचे कामगारांसह मनसे नेते दिलीप बापू धोत्रे ही स्वतःही काम करत अस लेली दिसून आले आहे.

काही दिवसांपूर्वी मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पंढरपूर तालुक्यातील कुस्ती मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करून त्यांच्या व्यथा जाणून घेत शेतकऱ्यांना आणि घरात पाणी शिरल्याने घराची पडझड झाल्याने कुटुंबातील तातडीची मदत म्हणून प्रत्येकी दहा हजार रुपये रोख स्वरूपाची आर्थिक मदत दिली होती सध्या शेतकऱ्यांना जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्नही निर्माण झाला होता असल्याने पशुधनी वाचवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुढे आली आहे मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी आपल्या स्वतःच्या शेतातील चार एकर उभे मका पीक काढून पूरबाजी शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा म्हणून दिलेले पूरग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे.

सौरभ नाईक यांची आपल्या सुश्राव्य स्वरांनी विठूराया चरणी गायन सेवा समर्पित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

श्रीक्षेत्र पंढरपूर:-श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मा. सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा यांचे उपस्थितीत दिनांक २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर सात दिवस दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत चालू असणाऱ्या नवरात्र संगीत महोत्सवाच सहावे गायन पुष्प ख्यातनाम उदयोन्मुख गयक सौरभ नाईक चेन्नई यांनी गुंफल. सुरुवातीला पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा, मेजर चंद्रकांत कोळी,संजय कोकीळ यांचे शुभहस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाली.सुरुवातीला मारवा रागामध्ये बंदिश आणि तराणा अप्रतिम गात शास्त्रीय संगीताची सुंदर मेजवानी देत पंढरी निवासा सखा पांडुरंग, जय दुर्गे दुर्गती परी हारीणी,माझे माहेर पंढरी,लक्ष्मी सरस्वती,शेवटी अगा वैंकुठीच्या राया भैरवी आणि विठूराया च्या गजराने भक्तीमय वातावरणात सांगता करत अप्रतिम स्वरांनी रसिकांना अक्षरक्ष: मंत्रमुग्ध केले आणि पंढरपूरकरांसाठी ही गानसेवा खास मेजवानी ठरली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला प्रशांत गाजरे हार्मोनियम मंगेश जवळेकर पखवाज विश्वेश्वर कोलंबीकर टाळ ज्ञानेश्वर दुधाणे यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली.सुत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे सरांनी केले.यावेळी पंढरपूर कला रसिकांनी शेवटपर्यंत मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.पुढे २९ तारखेपर्यंत चालणाऱ्या महोत्सवास उदंड प्रतिसाद देण्याचे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांचे वतीने करण्यात आले.हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती कर्मचारी वर्ग अधिक परिश्रम घेत आहेत

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती अनेक वर्षांपासून पंढरपूर नगरीचा जपतेय सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागात शेतकऱ्यांसोबतच भूमिहीन शेतमजूरांना नुकसान भरपाई मिळावी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे :- गतवर्षी संपूर्ण महाराष्ट्रभर पावसाने अक्षरशः थैमान घातलेले आहे. विशेषतः मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांम ध्ये पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झालेले आहे.अतिवृष्टीम ुळे अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने, घरांची पडझड झाल्याने,अनेक संसार उद्धवस्त झालेले आहेत. या सर्व परिस्थितीशी कष्टकरी , शेतमजुर , यांचं जगणं मुश्किल झालेले आहे. अशा परिस्थिती मध्ये निवारण्यासाठी शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातुन विविध उपाययोजना देखील केल्या जात आहेत. म ात्र या सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांसोबतच जे शेतम जूर शेतीमध्ये राबत असतात आणि ज्यांचा उदरनिर्वाह पुर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत रोजिरोटीचा प्रश्न उपस्थित झाला आहे. अशा भूमिहीन शेतमजूरांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान या काळात झालेले आहे. शेतीतील कामे ठप्प असल्याने या शेतमजूरांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. सरकारच्या माध्यमातुन शेतक-यांसाठी उपाययोजना राबवल्या जात आहेत मात्र या शेतमजूरांसाठी कोणत्याही प्रकारची तरतूद सरकारकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे आज

इटकुरच्या शेतमजूर तरुणांचे कळंब तहसीलदारांना निवेदन

तहसीलदार साहेब यांच्या माध्यमातुन सरकारला विनंती करण्यात आलेली आहे. येत्या ८ दिवसात सरकारने भूमिहीन शेतमजूरांच्या नुकसानीचा आढावा घेऊन तात्काळ मदत जाहीर करावी. आणि भूमिहीन शेतमजूरांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शासना-ने अनुदान स्वरूपात तात्काळ मदत करावी. जर यापुढे ही सरकार भूमिहीन शेतमजूरांच्या प्रश्नांबाबत असेच उदासीन धोरण अवलंबणार असेल तर येत्या ७ ऑक्टोबर पासुन आम्ही आमच्या मागण्यासाठी आमरण उपोषण करणार आहोत. असेल निवेदनात म्हटले आहे. या सर्व समस्यांचा विचार करावा असे आवाहन निवेदनकर्त्याने केले आहे.

प्रमुख मागण्या :- १) अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ मदत मि ळावी २) शेतकऱ्याप्रमाणेच शेतमजूरलाही मासिक भत्ता देण्यात यावा. ३)शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रु. मदत देण्यात यावी. या व इतर मागण्यासाठी कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनावर विनोद चव्हाण ,धनंजय मोरे, बिबिषण शेंडगे, हौसेराव शिंदे, नितीन रोकडे , श्रीकांत चव्हाण, राहुल कांबळे या शेतमजूर तरुणांच्या सह्या आहेत.

कोणतीही गाडी जात ये नसल्याने रुग्णांचे तोबाहाल

तातडीने पूल तयार करून मार्ग सुरळीत करण्याची मागणी

घोळसगाव गावचा चारीही बाजूचा संपर्क तुटल्याने गावकरी अडचणीत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी

तालुक्यातील मराठवाडा बॉण्ड्री लागत असलेले पश्चिम महाराष्ट्रातील शेवटचे गाव म्हणून ओळख अस-लेले घोळसगाव या गावचा गेल्या १५ दिवसापासून चारही बाजूनी संपर्क तुटल्याने गावाकऱ्यांचे तोबाहाल पाहायला मिळत असून, गावातील आजारी रुग्णांना, डिलेव्हरी रुग्ण यांना दवाखान्याला कसे व कुठून घेऊन जायचे हा यक्ष प्रश्न गावाकऱ्यासमोर उभा आहे. गावातील जीवनाआवश्यक वस्तूचा देखील तुटवडा जाणवत आहे. या सर्व गंभीर बाबीकडे प्रशासनाच्या नाकर्ते पाणामुळे घोळसगावकराना प्रचंड मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकऱ्यांना सांगून देखील त्यांनी बोरगाव ते घोळसगाव, घोळ-सगाव ते किरणळी, घोळसगाव ते किणी, घोळसगाव ते सिंदगाव या चारही रस्त्याचे काम जाणूनबुजून करत नसून, आम्ही जगायचं कसं अशी आर्त हाक घोळसगाव च्या ग्रामस्थांमधून पाहवयास मिळत आहे. जर चारही बाजूचे रस्ते तात्काळ दुरुस्त न केल्यास रस्ता रोको आंदोलन करणार असल्याचे घोळ-सगाव चे सरपंच राजशेखर किवडे यांनी सांगितले.

घोळसगाव चा चारही बाजूनं संपर्क तुटला असून, माझ्या गावाकऱ्यांची सर्व बाजूनी हाल होत आहेत. आजारी रुग्णांना रुग्णालय पर्यंत घेऊन जायचे कसे..? हा प्रश्न पडलाय. एकदा पेशन्ट जरी दगावला तर याला सरस्वी सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रशासन जबाबदार आहे. जर तात्काळ रस्ते दुरुस्त न केल्यास अमरण उपोषण करणार आहे.
– राजशेखर किवडे, सरपंच, घोळसगाव

दरोडा टाकण्याची तयारीत असलेले चार जणाची जामीन वर मुक्तता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी

हकीकत-दि१९/८/२०२५ रोजी हन्नूर रोड कडे जाणारे ब्रिज खाली दरोडा टाकण्याची तयारीत फिरत असलेले आर-ोपी (१)गावणू सिद्राम काळे वय ५०, रहाणार कोळीबेट ता, अक्कलकोट (२)सरदार अप्पा काळे वय २४, (३) इराप्पा दत्तू पवार वय २३,(४)शिवानंद दत्तू पवार वय २० सर्व रा, दर्गासिर, तालुका आळंद जिल्हा कलबुर्गी अक्कलकोट उत्तर पो-लीस स्टेशनला गुप्त माहितीगार कडून माहिती मिळताच पेट्रोलिंग ड्युटीवर असलेले पोलीस अधिकारी श्री पवार व पिंजारी जवळगे यांनी पोलीस निरीक्षक टाकाणे याचे मार्गदर्शनाखाली सर्व आरोपी यांना अटक करून त्याच्या विरुद्ध बि एन एस ३१०(४)३१०(५) अन्वये फिर्याद दाखल केली होती.

सदर प्रकरणात आरोपी यांनी जामीन अर्ज ऍड राजेंद्र फताटे मार्फत केली होती.

जामीन अर्ज कामी दोन्ही बाजूचे युतीवाद होऊन बचाव पक्षा तर्फे सदर आरोपी हे नातेवाईकाकडे भेटण्यास जात असताना गैरसमजुतीने खोट्या गुन्हात गोवलेला आहे असे अनेक मुद्दे मांडले सदर युक्तिवाद ग्राह्य धरून न्याय मूर्ती यो-गेश राणे यांनी सर्व आरोपीची ५०००० /जातमुचलक्य जामीन वर मुत्तता केली. यात आर-ोपी तर्फे ऍड राजेंद्र फताटे, ऍड भगवान भुसारी तर सरकार पक्षा तर्फे शीतल डोके यांनी काम पहिले.